महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# दहा लाखांखालील कामे म्हणजे भ्रष्टाचाराची कुरणे - आ. किसन कथोरे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात पर्यटन विभाग आणि वन विभागामार्फत दहा लाख रुपयांच्या आतील कामे म्हणजे सर्रास भ्रष्टाचाराचे कुरणे बनली असल्याचा गंभीर आरोप आमदार किसन कथोरे यांनी केला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्यांनी हा मुद्दा उपस्थित करत या कामांची सखोल चौकशी करण्याची जोरदार मागणी केली. ठाणे जिल्हा नियोजन समितीची बैठक बुधवारी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत बोलताना आमदार कथोरे यांनी पर्यटन व वन विभागाकडून मंजूर होणारी दहा लाखांखालील कामे ऑनलाईन प्रणालीत न आणता थेट पद्धतीने दिली जात असल्याचे निदर्शनास आणले. ही कामे ऑनलाईन न आल्याने ठेकेदार व संबंधित अधिकारी संगनमताने स्वतःचे 'उखळ पांढरे' करून घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात ती बोगस स्वरूपाची असल्याचा संशय व्यक्त करत, अशा सर्व कामांची स्वतंत्र व सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी स्पष्ट मागणी आमदार कथोरे यांनी बैठकीत केली. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे संबंधित अधिकारी व ठेकेदार वर्गात खळबळ उडाल्याची चर्चा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर सुरू झाली आहे.

## ठाणे जिल्हा नियोजन मंडळाची बैठक संपन्न

ठाणे जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत सन २०२६ - २७ च्या वार्षिक योजनांना मंजुरी देण्यात आली असून सर्वसाधारण योजना ६६० कोटी, आदिवासी उपयोजना १४० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १०७ कोटी अशा तरतुदींसह सुमारे १७०० कोटी प्रस्तावीत करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री आता पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. जिल्हा नियोजन मंडळाची आज बैठक पार पडल्यानंतर ते पत्रकाराची संवाद साधताना बोलत होते. जिल्ह्यातील सर्व विकासकामे नियोजित वेळेत गुणवत्तापूर्ण पूर्ण झाली पाहिजेत आणि १०० टक्के निधी खर्च झाला पाहिजे. कोणताही विभाग हलगर्जीपणा करत असल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल, असा इशाराही शिंदे यांनी दिला. तांत्रिक मान्यता, आराखडा तयार करणे, प्रस्ताव सादर करणे व निधी वेळेत खर्च करण्यावर भर देण्यात आला असून पीपीपी माध्यमातून होणाऱ्या कामांची विभागप्रमुखांनी प्रत्यक्ष पाहणी करून गुणवत्ता सुनिश्चित करावी असे निर्देश दिले. पावसाळ्यापूर्वी सर्व यंत्रणांनी सज्ज राहून रस्तेदुरुस्ती, खड्डे भरणे, डांबरी पॅचवर्क मे अखेरपर्यंत पूर्ण करावे, नागरिकांना गैरसोय होऊ नये व अपघात टळावेत यासाठी खबरदारी घ्यावी असे आदेश देण्यात आले. धोकादायक इमारतींना क्लस्टर पुनर्विकासात प्राधान्य देण्यास सांगण्यात आले असून जिल्हाधिकारी, महापालिका, पोलीस व आपत्ती व्यवस्थापन यांच्यात समन्वय ठेवण्याच्या सूचना दिल्या. भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नासाठी कायमस्वरूपी शेल्टर उभारणे, निर्बीजीकरण आणि ॲनिमल ॲम्ब्युलन्सची सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले. ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर विशेष लक्ष ठेवून साथीचे आजार टाळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सतर्क राहावी असे सांगण्यात आले तसेच सिव्हिल हॉस्पिटल लवकर सुरू करण्याबाबत निर्देश देण्यात आले. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाईचे आदेश देण्यात आले.शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी सेंद्रिय शेतीला प्राधान्य देण्यास सांगण्यात आले असून शेणखत स्थानिक शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे, कुरण लागवड व नाविन्यपूर्ण शेती प्रयोगांना चालना द्यावी अशा सूचना शिंदे यांनी दिल्या.

## संपादकीय

### उमेद आणि RSETI सारखे उपक्रम निर्णायक

ग्रामीण युवकांच्या स्वावलंबनाची दिशा ठरवणारा कौशल्य मेळावा ग्रामीण भागातील युवक-युवतींसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा अभाव. शिक्षण असूनही योग्य मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण आणि भांडवलाच्या संधी न मिळाल्याने अनेक युवक बेरोजगारीच्या कचाट्यात अडकतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) आणि ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण येथे आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय कौशल्य मेळावा ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या कौशल्य मेळाव्याने केवळ योजना मांडण्यापुरते मर्यादित न राहता, ग्रामीण युवकांना प्रत्यक्ष स्वयंरोजगाराच्या दिशेने नेणारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. RSETI योजनेअंतर्गत १८ ते ५० वयोगटातील युवक-युवतींसाठी मोफत निवासी व अनिवासी प्रशिक्षण, विविध क्षेत्रांतील सुमारे ६४ स्वयंरोजगाराभिमुख अभ्यासक्रम, तसेच प्रशिक्षणानंतर बँक कर्जाच्या संधी यामुळे हा उपक्रम अधिक परिणामकारक ठरतो. शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, उत्पादन आधारित उद्योग आणि उद्योजकता विकास यांसारख्या क्षेत्रांमध्ये ग्रामीण युवकांना संधी निर्माण करून देण्याची क्षमता या योजनेत आहे. कौशल्य मेळाव्यात शासकीय योजना, बँक कर्ज व्यवस्था, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योजकतेसाठी आवश्यक मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने युवकांमध्ये सकारात्मक उत्साह निर्माण झाला. महिला बचतगट सदस्यांचा मोठा सहभाग हे या उपक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा प्रशिक्षण व रोजगाराभिमुख उपक्रमांची गरज आहे.

जिल्हा परिषद, उमेद अभियान, RSETI, बँकिंग व्यवस्था आणि कौशल्य विकास यंत्रणा यांच्यातील समन्वयामुळे हा मेळावा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा उपक्रम ठरला आहे. आजच्या काळात सरकारी योजना केवळ कागदावर न राहता, त्या थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. अशा कौशल्य मेळाव्यांमुळे ही दरी कमी होत असल्याचे चित्र दिसते. भविष्यातही प्रत्येक तालुका आणि जिल्हा पातळीवर अशा कौशल्य मेळाव्यांचे सातत्याने आयोजन झाले, तर ग्रामीण युवकांच्या हातात रोजगाराची, स्वयंरोजगाराची आणि उद्योजकतेची ठोस संधी येईल. "नोकरी शोधणारा युवक" ते "नोकरी देणारा उद्योजक" ही परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने घडवून आणण्यासाठी उमेद आणि RSETI सारखे उपक्रम निर्णायक ठरतील, यात शंका नाही.

## कामगार विरोधी कायद्यांच्या निषेधार्थ अंगणवाडी - आशा सेविकांचा एल्गार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : केंद्र सरकारने जुने कामगार कायदे रद्द करून २१ नोव्हेंबर २०२५ रोजी चार नवीन श्रम संहिता कायदे लागू केले आहेत. या निषेधार्थ गुरूवारी ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, आशा सेविका, कारखान्यात काम करणारे कामगार तसेच तृतीय श्रेणीतील शासकीय कर्मचारी यांनी एकत्रित येत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आंदोलन केले. यावेळी लागू करण्यात आलेले नविन कायदे रद्द करावे अशी मागणी करण्यात आली.**

कामगार ठेवण्याचा अधिकार मालक वर्गाला, कामगारांना कामावरून काढून टाकण्याची बंधने शिथील, निश्चितकालीन कामगार ठेवण्यास मालक वर्गाला मोकळीक असे विविध कायदे केंद्र सरकारने लागू केले आहेत. या कायद्यांमुळे कामगारांना नोकरीची सुरक्षा राहणार नसून यापुढे कामगार संघटना बांधणे आणि चालविणे अशक्य होणार आहे. संप करणे हे शिक्षापात्र ठरणार आहे. या कायद्यामुळे कामगारांच्या मुलभूत हक्कावर बंधने आल्यामुळे कामगार वर्गाला गुलामासारखे जीवन जगावे लागणार असल्याचा आरोप कामगार संघटनांनी केला आहे. तसेच केंद्र सरकार शासकीय कर्मचाऱ्यांना आठवे वेतन आयोग लागू करण्याच्या विचाराधीन आहे. परंतू, अल्प मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी आणि आशा कर्मचाऱ्यांची आठवण केंद्र सरकारला झाली नाही. देशातील लाखो अंगणवाडी आणि आशा कर्मचारी 'आमचे वेतन आयोग कुठे आहे,' हा संतप्त सवाल सरकारला करीत आहेत. परंतू, सरकार याकडे दूर्लक्ष करत आहेत. या निषेधार्थ देशातील सर्व कामगार संघटनांनी १२ फेब्रुवारी रोजी जिल्हा स्तरावर आंदोलनाची हाक दिली होती. त्यानुसार, गुरुावरी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, आशा सेविका, कारखान्यात काम करणारे कामगार तसेच तृत्तीय श्रेणीतील शासकीय कर्मचारी असे ३०० हून अधिक कामगारांनी एकत्रित येत निदर्शने केली. यावेळी शिस्तमंडळाने ठाणे तहसीलदारांना निवेदन दिले.

## बेकायदा बांधकामांना थारा नको; काटेकोर कारवाई करा

### महापौरांचे केडीएमसीला आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली शहरांचे सौंदर्याकरण आणि हरितपट्टे जपण्यासाठी यापुढे शहरात एकही बेकायदा बांधकाम होता कामा नये, असे ठाम निर्देश महापौर ॲड. हर्षाली चौधरी-थविल यांनी दिले आहेत. आपल्या प्रभागांमध्ये कोणत्याही प्रकारचे बेकायदा बांधकाम होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी, असे आदेश त्यांनी प्रभाग साहाय्यक आयुक्तांना दिले. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या दहा प्रभाग साहाय्यक आयुक्तांची बैठक बुधवारी पालिका मुख्यालयात महापौर ॲड. हर्षाली चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत प्रभाग हद्दीतील विकासकामे, नागरी समस्या, मालमत्ता कर वसुली, वाहन कोंडी, बेकायदा बांधकामे, पाणीटंचाई, आरोग्य विषयक प्रश्न तसेच कर वसुली यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महापौरांनी आपल्या प्रभागात नव्याने कोणतेही बेकायदा बांधकाम उभे राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कुठेही बेकायदा बांधकाम सुरू असल्याची माहिती किंवा तक्रार प्राप्त होताच तातडीने कारवाई करावी, असे आदेशही महापौर ॲड. हर्षाली चौधरी यांनी प्रभाग साहाय्यक आयुक्तांना दिले.



## रायते : राष्ट्रीय महामार्गाच्या सरकारी जमिनीतून माती चोरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील रायते गावाजवळ राष्ट्रीय महामार्गासाठी भू-संपादित करण्यात आलेल्या सरकारी जागेतील मातीची ठेकेदाराकडून सर्रास चोरी सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. राष्ट्रीय महामार्गाचे काम करणाऱ्या शिवालय कंपनीच्या ठेकेदाराने कोणतीही परवानगी न घेता, रॉयल्टी न भरता दिवसाढवळ्या मातीचे उत्खनन करून नेल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेली जमीन ही पूर्णतः शासकीय असून, त्यावरील मातीही शासनाची मालमत्ता आहे. मात्र, या जागेतील मातीचा भरमसाठ उपसा करून ती इतर ठिकाणी वाहून नेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष म्हणजे या मातीसाठी कोणतीही रॉयल्टी भरलेली नसून, अधिकृत उत्खनन परवानगीही घेण्यात आलेली नाही. या बेकायदा उत्खननामुळे सर्कल परिसरातील जमिनीत मोठमोठे खड्डे पडून जणू तलावासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

या गंभीर प्रकरणाबाबत रायते येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते विजय सुरोशी आणि शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख नरेश सुरोशी यांनी कल्याण तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. शासकीय जमिनीतील मातीची अशी खुलेआम चोरी होत असताना महसूल व संबंधित विभागांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

सरकारी जमिनीवरील मातीचा अवैध उपसा म्हणजे थेट शासनाच्या तिजोरीवर डल्ला असून, संबंधित ठेकेदारावर तातडीने कठोर कारवाई करावी, माती चोरी प्रकरणाची सखोल चौकशी करून नुकसानभरपाई वसूल करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. प्रशासन आता या प्रकरणावर काय भूमिका घेते, याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात महत्वाचे






### नियमबाह्य शालेय वाहतुकीवर आरटीओची धडक कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**बदलापूर :** बदलापूर शहर परिसरात उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता, शालेय बस वाहतूक नियमांचे उल्लंघन करून रिक्षा, ओमनी व वीस आसनी वाहनांतून विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कल्याण विभागाच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार वाहन निरीक्षकांच्या पथकाने बुधवारी दिवसभरात कारवाई केली. या कारवाईत एकूण १३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करत एक लाख ३६ हजार रुपयांचा दंड वाहन चालक व मालकांकडून वसूल करण्यात आला. कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणी नसलेल्या वाहनातून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बदलापूरमधील एका वाहन चालकाने वाहनातच एका बालिकेशी अश्लील चाळे करून गैरप्रकार केल्याची घटना समोर आल्यानंतर या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले होते. या घटनेनंतर अशा प्रकारे नियमबाह्य पद्धतीने विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या, तसेच शालेय बस वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालक व मालकांवर कठोर कारवाईची मोहीम उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या कल्याण विभागाने हाती घेतली आहे. यापूर्वीही अशाच प्रकारे नियमबाह्य वाहतूक करणाऱ्या तीसहून अधिक वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, पुढील काळातही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## शहापूरसाठी नवी पाणीपुरवठा योजना लवकरच मार्गी लागणार



शहापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भविष्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागू नये, यासाठी कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला आहे. नगरपंचायतीकडून सादर करण्यात आलेल्या पाणी आरक्षणाच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी त्यांनी जलसंपदा मंत्र्यांची भेट घेऊन लोकहिताचा मुद्दा प्रभावीपणे मांडला. त्यामुळे या दीर्घकालीन पाणीपुरवठा योजनेस गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १२**

**शहापूर :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर भागात मोठी धरणे असून त्यातून मुंबई महानगरातील अनेक शहरांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, धरणांच्या सान्निध्यात असलेल्या शहापूर शहरालाच पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे वास्तव आहे. या पार्श्वभूमीवर शहापूर नगरपंचायतीच्या वाढत्या लोकसंख्येला पुरेसे व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्याची मागणी होत असून, या संदर्भात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी घेतलेल्या भेटीनंतर या योजनेला गती मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शहापूर नगरपंचायतीची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार झाल्यानंतर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना सन १९८३ मध्ये राबविण्यात आली असून, ती आता कालबाह्य ठरली आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित, पुरेसे व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे प्रशासनास आव्हानात्मक ठरत आहे.

शहराची भावी लोकसंख्या वाढ आणि सन २०४४ पर्यंतची पाण्याची गरज लक्षात घेऊन भातसा नदी या स्त्रोतावर आधारित नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या संदर्भात आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी शासनाकडे निवेदन सादर करून योजना तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली आहे. नगरपंचायतीने आवश्यक ठराव मंजूर करून पाणी आरक्षणाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून, काही खासगी प्रकल्पांचे पाणी आरक्षण रद्द झाल्यानंतर उपलब्ध झालेल्या सुमारे २.५७ दलघमी प्रतिवर्ष पाणी आरक्षण शहापूर नगरपंचायतीस देण्याचा प्रस्ताव सध्या प्रलंबित आहे. हा प्रस्ताव लोकहिताचा असल्याने त्यास तातडीने मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी आमदार डावखरे यांनी केली आहे.

# स्व. दिगंबर विशेंचे कार्य समाजासाठी प्रेरणास्थान

## - आ.किसन कथोरे





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : स्व. दिगंबर विशेंनी केलेले शैक्षणिक व कृषीक्षेत्रातील काम कायम चिरकाल स्मरणात राहील व ही शाळा असे पर्यंत त्यांचे नाव सर्वांच्या मुखात येईल असे प्रतिपादन मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी कुडवली येथिल मृण्मयी विकास प्रबोधिनी संस्थेच्या नामकरण सोहळया प्रसंगी केले. सर्वोदय विद्यालय कुडवली ही शाळा स्व. दिगंबर विशे यांनी उभारली आहे. दिगंबर विशे सरांच्या मृत्यू नंतर त्यांचे नाव कायमस्वरूपी स्मरणात राहावे या उदात्त हेतूने संस्थेने सर्वोदय विद्यालयाचे नामकरण बदलून "दिगंबर नारायण विशे विद्यालय कुडवली"असे नामकरण केले असून त्याचे उद्धाटन आज आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी माजी आमदार गोटिरामभाऊ पवार, संस्थेच्या अध्यक्षा दिपाली दिगंबर विशे मॅडम, प्रकाश भांगरथ, सुरेश बांगर, संतोष पवार,मा. नगराध्यक्ष मोहन सासे, मुकेश विशे, कुडवली सरपंच रामचंद्र सासे, अनिल घरत, रेश्मा घरत,ज्योती गोडांबे, अशोक ईरनक, बाळू हरड, चंद्रकांत बोस्टे, संतोष विशे, संचालक यशवंत हरड,रचना चव्हाण,दिगंबर घुडे, शशांक विशे उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे सचिव भगवान देसले यांनी प्रास्ताविक पर भाषणात स्व. दिगंबर विशेसरांच्या १९८४ पासूनच्या त्यांच्या सामाजिक चळवळी पासून ते राजकीय जीवनावर पटावर प्रकाश टाकून सरांच्या शैक्षणिक व राजकीय, कृषी कार्याचे सुंदर अवलोकन त्यांच्या शब्दात केले.

तर या कार्यक्रमात मुरबाड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात असूनही कृषी क्षेत्राची प्रचंड आवड असणारे विशे सरांचे शिष्य ज्यांनी शेतीमध्ये नविन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्रांती घडवणारे खेवारे येथील शिक्षक विलास मारूती शिरोसे यांचा दिव्यांग फाऊंडेशन तर्फे "कृषी भूषण पुरस्कार "सपत्निक देऊन गौरव करण्यात आले.

तर या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा देसले,सहशिक्षक भालचंद्र कुर्ले, मधुरा सासे व इतर कर्मचाऱ्यांनी केले होते. तर या कार्यक्रमाचे सदाबहार सुत्रसंचालन हेमंत झुंजारराव यांनी केले.

# वारंवार खंडित होणाऱ्या विज पुरवठ्यामुळे वासिंदकर त्रस्त

## कायम स्वरूपी तोडगा काढण्याची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : अंधाराचा वसा दूर करणाऱ्या विजवितरण कंपनीने अंधार पसरवायचा ठरविल्यावर दाद कुणाकडे मागायची असा संतप्त सवाल वासिंद व परिसरातील विज ग्राहकांमधून विचारला जात आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून वासिंद व परिसरात सातत्याने विजेचा लपंडाव सुरु आहे एकदा लाईट गेली की ती कधी येईल हे सांगता येत नाही यासाठी खातीवली येथील टाटा हौसिंग सबस्टेशन मधून वासिंद विभागासाठी स्वतंत्र विद्युत पुरवठा सुरु करून त्यास पडघे किंवा पाली येथील जिंदाल पॉवर स्टेशन मधून ईनकमर लाईन देऊन वारंवार खंडित होणारा विज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी विज ग्राहकांमधून व विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींकडून केली जात आहे.विज पुरवठा खंडित झाल्यावर विज वितरणचे अधिकारी व कर्मचारी यांना फोन केले असता ते फोन घेण्यास टाळाटाळ करीत असतात साधा फोन उचलण्याचे सौजन्य ते दाखवीत नाहीत त्यामुळे याचा परिणाम पाणी,शिक्षण, आरोग्य यावर होत असतो. सद्य स्थितीला अनेक शाळांमध्ये इयत्ता 12 वीच्या परीक्षा सुरू आहेत तर 10वीच्याही परीक्षा सुरु होणार असून त्याचा फटका विद्यार्थी वर्गाला मोठ्या प्रमाणात बसताना दिसत आहे वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही मोठ्या प्रमाणावर होत आहे याची थोडीही जाणीव या अधिकारी, व कर्मचारी वर्गाला होताना दिसत नाही. त्यातच या भागातील व्यापारी मंडळाचे अध्यक्ष निलेश काठोळे यांच्या मार्गदर्शनाखाली वासिंदचे सरपंच राजेंद्र म्हसकर,नगरसेवक बाळू दादा जगे, संदिप पाटील, महावितरणचे जनमित्र दिलावर पठाण, समीर जोशी,राजेंद्र भेरे, प्रदीप भालेराव, संदिप म्हसकर, पुंडलिक काठोळे, मिलिंद ठाकरे, सुभाष विशे, संदिप खिसमतराव, अमोल बोराडे प्रकाश वाघमारे सह सर्व वासिंदच्या विकासासाठी धडपडणारे समाजसेवक आहेत यांनी तर कल्याण ग्रामीणचे मुख्य अभियंता धनंजय औढेकर यांना लेखी निवेदन देऊन कायम स्वरूपी तोडगा काढण्याची विनंतीही केली होती. त्यावेळी 15 जून पर्यंत टाटा हौसिंग मधील सबस्टेशन सुरु करण्यात येईल पुढील ईनकमर सुरु करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर सादर केला जाईल असे आश्वासन देण्यात आले होते पण ते आश्वासन हवेतच विरले गेले. वासिंद व परिसरात राहणारी काही मोजकी माणसे समाजसेवा करण्यासाठी धडपड करीत असतात पण अधिकारी व कर्मचारी वर्गाची मानसिकता मात्र दिसत नाही ते नेहमीच आपल्या अनुभवाच्या जोरावर उडवा उडवीची उत्तरे देऊन मोकळी होतात. आज वासिंद व पारिसरात अनेक ठिकाणी जीर्ण झालेल्या विद्युत तारा, गंजलेले व वाकलेले लोखंडी पोल दिसत असून येथील अधिकारी वर्गाने याचे योग्य नियोजन करून जीर्ण झालेल्या विजतारा व पोल बदलून घेण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत तसेच फॉल्टीमीटर ताबडतोब बदलून दिले पाहिजे आणि वाढीव येणाऱ्या बिलांबाबत योग्य ती कार्यवाही केली पाहिजे पण तसे होताना दिसत नाही उलटपक्षी एखादे खाजगी काम असेल तर हे कर्मचारी त्या कामाला प्रथम प्राधान्य देऊन सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष करताना दिसत असतात त्यामुळे सातत्याने होत असलेल्या या विजेच्या लपंडावाचा फटका येथील व्यापारी,दुकानदार,भाजीपाला विक्रेते, दुग्ध व्यवसाईक, संगणक केंद्र, आधार केंद्र, बँका, हॉटेल, वेल्डिंग शॉप सहीत विद्यार्थी वर्गाला मोठ्या प्रमाणात बसताना दिसत आहे. आता तर 12वी परीक्षा सुरू आहेत काही दिवसानंतर 10 वीच्या परीक्षा सुरू होणार आहेत त्यानंतर मेडिकल व इंजिनिअरिंगच्या परीक्षा होणार असल्याने या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणात होईल अशी भीती त्यांना वाटत असते . सातत्याने होणाऱ्या या विजेच्या लपंडावामुळे पालक वर्गही कमालीचा हैराण झाला असून याकडे लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून रोजच होणाऱ्या या समस्सेवर कायमस्वरूपी उपाय योजना कराव्यात अशी माफक अपेक्षा करताना दिसत आहे तसेच वासिंद ग्रामपंचायत वार्ड क्रमांक तीन चे नगरसेवक बाळू दादा जगे यांनीही शहापूर डिव्हिजनचे उपकार्यकारी अभियंता इंगळे साहेब यांच्यासमोर लाईटच्या समस्यांचा पाढा वाचला असून यावर लागलीच उपाययोजना करावी अन्यथा आम्हाला महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढावा लागेल असा इशाराही दिला आहे.हे चित्र जर असेच राहिले तर एक दिवस नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होईल व याची सर्व जबाबदारी विज वितरण कंपनीची असेल असे त्रस्त वासिंदकर नागरिकांकडून बोलले जात आहे.

# कॉपीची कुप्रथा



आपल्याकडे फेब्रुवारी - मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी - बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी - बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दहावी बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी - बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शिवमंदिर स्मशानभूमी पुर्नबांधणीसाठी राहणार बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली (पूर्व) विभागातील दत्तनगर येथील शिवमंदिर स्मशानभुमी (मोक्षधाम) ही जुनी स्मशानभुमी तोडून तेथे आधुनिक पध्दतीच्या नविन स्मशानभूमी प्रकल्पास महापालिकेने मंजुरी देऊन सन 2024 मध्ये कार्यादेश प्रदान केलेला आहे. या स्मशानभुमीची पुर्नबांधणी करण्यासाठी, जुनी स्मशानभुमी तोडण्याचे काम रविवार दि.15 फेब्रुवारी पासून सुरु करण्यात येणार आहे. यामुळे शिवमंदिर स्मशानभुमीमध्ये फक्त गॅस शवदाहिनी सुरु राहिल, उर्वरित स्मशानभुमी संपुर्णपणे बंद राहील. तरी नागरीकांनी अंत्यविधीसाठी डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखान पाडा स्मशानभुमी, डोंबिवली पूर्वेतील पाथर्ली स्मशानभुमी, कल्याण रोड, आणि म्हसोबा चौक स्मशानभुमी, ठाकुर्ली या स्मशानभुमींचा वापर करुन, महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# खारेपाट विभागात आठवड्यातून एकदा पाणी म्हणजे सर्वार्थाने कुचंबना : सी.आर.म्हात्रे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : खारेपाट विभागात आत्ता नवीन विकासाचे मॉडेल तयार झाले आहे,जणू सात दिवसात एकदा पाणी आणि पाच वर्षात एकदा मतदान.शहापाडा आणि हेटवणे धरण या दोन धरणांच्या कुशीत वसलेला खारेपाट आज तहानलेला आहे. विशेष म्हणजे हेटवणे धरणातील पाणी भोगावती नदीत २४ तास खळखळत आहे.आणि शहापाडा धरण हेतूपुरस्कर जानेवारी अखेर कोरडा पाडला जातो. म्हणजे आभाळातील पाण्याचे योग्य नियोजन नाही.किंवा प्राधान्यक्रम हरवला आहे.की कृत्रिम अडचण आहे हे एक न उलगडणारे कोडे आहे.अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी केली आहे.

विकासाचा नवा अर्थ,रस्ते सिमेंटचे , चमकदार भाषणे रंगीत,बॅनर पण नळ मात्र कोरडा.कोणत्याही विकास कामांच्या उद्घाटनाला टेबलावर पाण्याच्या बाटल्या ठेवल्या जातात,मात्र गावकऱ्यांच्या घरात रिकामे हांडे, रिकाम्या पाण्याच्या टाक्या,हा विरोधाभास नसून व्यवस्थेचा विनोद आहे. सात दिवसाचे राजकारण. पहिला दिवस पाणी येणार आहे अशी अफवा.दुसरा दिवस टँकर वाल्यांचा उत्साह.तिसरा दिवस लाडक्या बहिणीच्या डोक्यावर हंड्यांची मिरवणूक ,चौथा दिवस शेती करपल्याचा श्वास ,पाचवा दिवस प्रशासनाचे मौन,सहावा दिवस नेत्यांचे दौरे फोटो शूट, सातवा दिवस पाण्याची एक धार,आणि प्रतीक्षा. मात्र हा आठवडा संपतो पण समस्या संपत नाहीत.राजकारण्यांना मात्र हे प्रश्नच का पडत नाहीत.हे आश्चर्य आहे.

दोन धरणे असून पाण्याचे दुर्भिक्ष्य का?सिंचनाच्या निधीचे काम अडखळत का सुरू आहे?टँकर व्यवसाय कोणाच्या आशीर्वादाने वाढत आहे?निवडणुकीत २४ तास पाण्याची घोषणा करणारे प्रतिनिधी गप्प का?ही पाण्याची टंचाई कोणाच्या कामाची आहे?सामाजिक आणि आर्थिक परिणामांना कोण जबाबदार आहे?महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा कायमचा कधी उतरणार, विद्यार्थी अभ्यास करणार का पाण्याची वाट पाहणार,विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके कमी पाण्याच्या बाटल्या जास्त.

शेतकऱ्यांच्या शेतात पाणी नाही,पण नेत्यांच्या भाषणात घोषणांची समृध्दी जास्त.पाणी ही भीक नाही तर ती हक्क आहे.खारेपाट विभागाला वर्षानुवर्ष तहानलेला ठेवणे त्यांची ही तडफड एक दिवस उद्रेक करेल. यांची यादी ठेवा असा सक्त इशारा ही दिला आहे.

सात दिवसातून एकदा पाणी,पाणीपट्टी सुद्धा याच समीकरणातून भरली पाहिजे. सात दिवसातून एकदा पाणी शाळांनी नियोजन कसे करावे,स्वच्छता कधी राखावी,पाण्यासाठी मुलांचा अभ्यास बुडतो,शाळेत गैरहजेरी वाढते, याला जबाबदार कोण?आज १२ वी परीक्षा सुरू,१० वी परीक्षा सुरू होणार आहे, त्यांच्या अभ्यासावर काहीसा परिणाम होणारच,रात्री अपरात्री पाणी येणे त्याचा साठा करण्यासाठी मुलींना जास्त त्रास होतो.त्यांचे अभ्यासाचे तास कमी होतात याला जबाबदार कोण?सामाजिक परिणाम हे दूरगामी होताना दिसतात .कुटुंबावर विकतचे पाणी यामुळे आर्थिक घडी विस्कटली आहे.आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे आंदोलने,रस्ता रोको, याची पायाभरणी होते.दोन धरणांच्या कुशीत वसलेला हा आमचा खारेपाट असा खालपासून सपाट होत चालला आहे.धन्य ते नेते, धन्य तो विकास,सलाम तुम्हाला अशी नाराजी व्यक्त केली आहे.

# साहित्य व दिवाळी अंक स्पर्धेत कल्याण वाचनालयाचे निकाल जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सार्वजनिक वाचनालय कल्याण या संस्थेच्यावतीने राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार व दिवाळी अंक स्पर्धा २०२५ चे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. मराठीतील ज्येष्ठ कथालेखक दि.बा.मोकाशी, कविवर्य माधवानुज तसेच कै. श्रीधर घारपुरे ललित साहित्य पुरस्कार व दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी जाहीर केला.कथाकार दि.बा. मोकाशी कथासंग्रह पुरस्कार सुरेंद्र दरेकर यांच्या “वर्जितमध्य” व छाया महाजन यांच्या “माणसांच्या गोष्टी” या कथासंग्रहाला विभागून दिला जाणार आहे. कविवर्य माधवानुज काव्य संग्रह पुरस्कार राजीव काळे यांच्या “हंसध्वनी” व संतोष विठ्ठल घसिंग यांच्या “ऋतुसमिधांच्या आर्द्रा” या काव्य संग्रहाला विभागून दिला जाणार आहे. त्याचबरोबर विशेष लक्षवेधी पुरस्कारासाठी चित्रा बावीस्कर यांच्या “भाग्यवेल” या काव्य संग्रहाची निवड करण्यात आली आहे. कै. श्रीधर घारपुरे ललित साहित्य पुरस्कारासाठी संगीता अरबुने यांच्या “एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी” व वर्षा किडे – कुळकर्णी यांच्या “काळीजफूल” या ललित संग्रहास विभागून देण्यात येत आहे.

दिवाळी अंक स्पर्धा २०२५ प्रथम पारितोषिक - आनंद तरंग, द्वितीय पारितोषिक नदी, तृतीय पारितोषिक – शब्दांगण, प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक – पुनवा, द्वितीय उत्तेजनार्थ पारितोषिक – विश्वभ्रमंती या दिवाळी अंकास पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. साहित्यिक क्षेत्रातील या मानाच्या पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक १ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता वाचनालयाच्या सभागृहात संपन्न होणार आहे. या सोहळयास साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी व उपाध्यक्षा आशा जोशी यांनी केले आहे.

# भविष्यवेध



**शुक्रवार**
**१३ फेब्रुवारी २०२६**

**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल, तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कर्क**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**सिंह**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कन्या**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**तुळ**
कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**धनु**
विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल,

**मकर**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कुंभ**
अशा व्यक्तीला भेटू शकता जो भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**मीन**
जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

# उल्हासनगर विकासासाठी सर्वपक्षीय समन्वयाची गरज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर (प्रशांत घोडविंदे)** : शहरातील नागरी समस्यांची सोडवणूक आणि प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी महापौर अश्विनी निकम यांनी मंगळवारी दुपारी सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक घेतली. महापालिका आयुक्त मनीषा अव्हाळे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. सुरुवातीला सर्व विभागप्रमुखांनी आपापल्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना आणि कार्याची माहिती महापौरांना दिली. तातडीच्या प्रश्नांवर महापौरांनी प्रशासनाला धारेवर धरत डॉग सेंटरच्या कामाचा आढावा घेऊन उपाययोजनेचे निर्देश दिले.





# बचत गटांमध्ये पर्यावरणपूरक प्रशिक्षणाची जागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महिला बचत गटांसाठी कचरा व्यवस्थापन तसेच सूक्ष्म हिरव्या भाज्यांची लागवड या विषयांवर विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम शहरी उपजीविका केंद्र, तत्त्वज्ञान विद्यापीठ येथे पार पडला. महिला सक्षमीकरणासोबतच पर्यावरण संवर्धनाला चालना देण्याच्या उद्देशाने ठाणे पालिकेच्या पर्यावरण विभाग व समाज विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात परिसर विकास भगिनी संस्था, स्त्री मुक्ती संघटना, अँटी प्लास्टिक ब्रिगेड, समर्थ भारत व्यासपीठ आदी संस्थांचा सक्रिय सहभाग आहे.

# विठ्ठलवाडी परिसरात स्वच्छता व अतिक्रमण हटविण्याची कारवाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

आज प्र स १ व २ चे कार्यक्षेत्रात विठ्ठलवाडी स्टेशन रोड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सी बलॅाक या मुख्य रस्त्यांवर डीप क्लीन अभियान व अतिक्रमण हटवण्यासाठी प्रस कार्यालय, आरोग्य विभाग व वाहतुक पोलीस यांनी संयुक्त मोहीम घेऊन कारवाई करण्यात आली.

# श्री समर्थ सेवा मंडळा तर्फे दास नवमी उत्सव साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : दरवर्षीप्रमाणे यंदाही दास नवमी उत्सव बुधवारी श्री समर्थ सेवा मंडळा तर्फे डोंबिवलीतील श्री गणेश संस्थान मधील वक्रतुंड सभागृह येथे साजरा करण्यात आला. यंदाचे हे 32 वे वर्ष आहे. श्री समर्थ चरित्र याचा संस्कार बालमनावर व्हावा हाच यामागील विचार आहे. अलका मुतालिक आणि श्रीनिवास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यात महात्मा गांधी प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरी चौथीचे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

यावर्षी देखील पन्नास विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेऊन मनाच्या श्लोकाचे शुद्ध स्वरात पठण केले. प्रत्येक विद्यार्थ्याला मनाच्या श्लोकांची एक प्रत देण्यात आली. 120 मनाचे श्लोक विद्यार्थ्यांनी खड्या आवाजात म्हणून वातावरणात चैतन्य निर्माण केले. दासबोध आणि मनाचे श्लोक यांचे वाचन केल्यामुळे मनावर सकारात्मक परिणाम होतात याचे महत्त्व जाणून शाळेचे मुख्याध्यापक अजयकुमार जोगी यांनी सहकारी शिक्षकांसह शाळेतील विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभाग घेण्यास प्रोत्साहित केले. जोगी यांचा संत साहित्याचा गाढा अभ्यास असल्याने त्यांचे विविध लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असतात. दास नवमीच्या निमित्ताने जनमत वर्तमानपत्रात मनाचा महामंत्र या सदरात मनाच्या श्लोकांवर उत्तम विवेचन त्यांनी लिहिले आहे. या कार्यक्रमास शाळा समिती सदस्य नितीन मांडे उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# शहापूरमध्ये नवोदय विद्यालयासाठी बिनशर्त जागा मंजूर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, निवासी व सर्वांगीण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शहापूर तालुक्यात नवोदय विद्यालय उभारणीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार आ. ॲड. निरंजन डावखरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळत जलसंपदा (तापी, विदर्भ व कोकण विभाग) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री मा. श्री. गिरीश महाजन यांनी संबंधित प्रस्तावास अंतिम मंजुरी दिली आहे. मा. श्री. गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ८९ वी बैठक बुधवारी सिंचन भवन, ठाणे येथे पार पडली. या बैठकीत शहापूर तालुक्यातील भातसानगर येथे प्रस्तावित नवोदय विद्यालयासाठी सिंचन विभागाकडून जागा बिनशर्त मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, संबंधित बोर्ड बैठकीत या निर्णयास अंतिम मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे



## आ. ॲड. निरंजन डावखरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ व कल्याण तालुक्यांतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जवळच नवोदय विद्यालयाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या अनुषंगाने ठाणे येथे मा. मंत्री श्री. गिरीश महाजन यांची भेट घेऊन आ. ॲड. निरंजन डावखरे यांनी त्यांचे आभार मानले. सातत्यपूर्ण पाठपुरावा व सकारात्मक सहकार्यामुळे शहापूर परिसरातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण

## शहापूरमध्ये नवोदय विद्यालय उभारणीस ऐतिहासिक टप्पा – मा. मंत्री श्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सिंचन विभागाकडून बिनशर्त जागा मंजूर

शिक्षणाचा मार्ग अधिक सुकर झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी बोलताना आ. ॲड. निरंजन डावखरे म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही देशातील सर्वोत्तम शैक्षणिक संधी मिळाव्यात हा माझा सातत्याचा ध्यास आहे. शहापूरमधील नवोदय विद्यालय हा त्या दिशेने टाकलेला ठोस आणि दूरगामी परिणाम करणारा टप्पा आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार निर्णयप्रक्रिया वेगाने राबवत आहे. आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून शिक्षणाची गंगा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावी या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या योजना विद्यार्थ्यांच्या हिताच्या ठरत आहेत. या निर्णयाबद्दल मा. मंत्री श्री. गिरीश महाजन यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो."

यापूर्वी ठाणे व पालघर जिल्हे एकत्र असताना पालघर येथील नवोदय विद्यालयामुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अडचणींना सामोरे जावे लागत होते. जिल्हा विभाजनानंतर ठाणे जिल्ह्यासाठी स्वतंत्र नवोदय विद्यालयाची मागणी आ. ॲड. निरंजन डावखरे यांनी सातत्याने लावून धरली होती. जिल्हा परिषदेचा ठराव, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि स्थानिक गरज लक्षात घेऊन २०२४ साली शासनाने ठाणे जिल्ह्यात नवोदय विद्यालय स्थापनेस मंजुरी दिली. आता जागेसाठी अंतिम मंजुरी मिळाल्याने नवोदय विद्यालयाच्या प्रत्यक्ष उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. शहापूर व संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी हा निर्णय शैक्षणिक विकासाचा मैलाचा दगड ठरणार असून, विद्यालय उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय ठेवून सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास आ. ॲड. निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला.

# महापालिकेच्या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा

## : महापौर हर्षाली चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : हिंद -दी -चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शाहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त महापालिकेने आयोजिलेल्या आरोग्य शिबीराचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर हर्षाली चौधरी यांनी आज केले. महापालिकेच्या बाई रुक्मिणीबाई रुग्णालयात आयोजिलेल्या आरोग्य शिबीराचे उद्घाटन करतेवेळी त्यांनी हे आवाहन केले.

यावेळी महापालिका आयुक्त अभिनव गोयल, वैद्यकीय आरोग्य विभागाचे उपआयुक्त प्रसाद बोरकर, महापालिका सचिव





किशोर शेळके, बाई रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सुलक्षणा त्रिभुवन, नवनिर्वाचित पालिका सदस्य/सदस्या तसेच इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य शिबीरे ही नागरीकांची मुलभूत गरज आहे, महानगरपालिकेने अशी शिबीरे सर्वत्र, ग्रामीण भागातही लावावीत, आरोग्य या विषयाबाबत कुठलीही कमतरता ठेवू नये असे सांगतानाच शासनाचा निधी हवा असेल, तर आपण पाठपुरावा करु, असे आश्वासनही महापौर हर्षाली चौधरी यांनी यावेळी दिले.

राष्ट्रीय एकतेचा संदेश सामान्य नागरीकांपर्यत पोहचवा, या हेतूने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शाहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त या विनामुल्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असून, राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी या शिबीराच्या माध्यमातून करावी, गरोदर मातांसाठी विशेष शिबीर लावावे, विशेषकरुन दि.08 मार्च रोजी, जागतिक महिला दिनी महिलांसाठी कॅन्सर स्क्रिनींगचा कार्यक्रम ठेवावा, अशा सूचना महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी बोलताना दिल्या.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350व्या शाहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त महापालिका अंतर्गत असलेल्या नागरी आरोग्य केंद्रांमध्ये दि.27 फेब्रुवारी 2026 पर्यंत विनामुल्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून, असंसर्गजन्य आजार, संसर्गजन्य आजार, गरोदर माता तपासणी, नेत्र तपासणी, बालरोग तपासणी तसेच इतर आरोग्य विषयक सेवा या आरोग्य शिबीरात दिल्या जाणार आहेत.

हा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर महापौर हर्षाली चौधरी आणि आयुक्त अभिनव गोयल यांनी स्वत: आंतररुग्ण विभाग (आयपीडी), बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), औषध साठा भंडार इ. ठिकाणी समक्ष पाहणी करुन, उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

कामकाजाच्या व्यग्रतेमुळे स्वत:ला जाणावणारा थकवा आणि कणकणीसाठी महापौरांनी महापालिकेच्या रुग्णालयातील ओपीडी विभागात स्वत:ची आरोग्य तपासणी करुन, औषधाची मात्रा घेवून, नागरीकांसमोर एक आदर्श घालून दिला.

# ठाणे स्थानकात पावसाच्या पाण्याचा प्रश्न मार्गी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे(प्रशांत घोडविंदे) :** ठाणे रेल्वे स्थानकावर दरवर्षी पावसाळयात उद्भवणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर मध्य रेल्वेने अखेर ठोस उपाययोजना केली आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक १, २ आणि ३ वर पावसाचे पाणी साचल्याने होणारा प्रवाशांचा त्रास, रेल्वे सेवांवरील परिणाम आणि सिग्नल यंत्रणेत होणारा बिघाड यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मायक्रो टनेलिंग तंत्रज्ञानाच्या मदतीने नवीन जलनिस्सारण प्रणाली उभारली आहे. हे काम नुकतेच पूर्ण झाले.

ठाणे स्थानकाच्या पश्चिम भागातून येणारे पावसाचे पाणी वर्षानुवर्षे फलाटांवर साचत होते. यामुळे अनेकदा रेल्वेमार्ग पाण्याखाली जात होते. सिग्नल यंत्रणा निकामी होत होती आणि लोकल तसेच लांब पल्ल्याच्या गाड्या उशिरा धावू लागायच्या. मुसळधार पावसात काही वेळा रेल्वे सेवा थांबवावी लागायची. पाण्यामुळे फलाटांवर प्रवाशांची गर्दी वाढून अपघाताचा धोका निर्माण होत होता.

### नव्या व्यवस्थेमुळे पावसाचे पाणी वेगाने बाहेर काढले जाणार असून फलाट व परिसर कोरडा राहणार

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जात होती, मात्र ती तात्पुरती उपाययोजना ठरत असल्याने समस्या कायम राहात होती. स्थानक परिसरात पारंपरिक पद्धतीने मोठे उत्खनन करणे शक्य नसल्याने रेल्वे प्रशासनासमोर तांत्रिक अडचण उभी ठाकली होती.

प्रवासी वाहतूक आणि रेल्वेसेवा सुरू ठेवतच काम पूर्ण करणे हे मोठे आव्हान होते. या परिस्थितीत मध्य रेल्वेने वाहतुकीला कोणताही अडथळा न आणता मायक्रो टनेलिंगद्वारे भूमिगत जलनिस्सारण मार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला. गेल्यावर्षी १ डिसेंबरपासून कामाला सुरूवात झाली होती.

या प्रकल्पामुळे अडचणींवर मोठ्या प्रमाणात मात होणार असून, गाड्यांच्या वेळेत होणारे विलंब, सिग्नल बिघाड आणि प्रवाशांची गैरसोय कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दत्तनगर शिवमंदिर स्मशानभूमीच्या पुनर्बांधणीला प्रारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली (पूर्व) विभागातील दत्तनगर येथील शिवमंदिर स्मशानभुमी (मोक्षधाम) ही जुनी स्मशानभुमी तोडून तेथे आधुनिक पध्दतीच्या नविन स्मशानभूमी प्रकल्पास महापालिकेने मंजुरी देऊन सन 2024 मध्ये कार्यादेश प्रदान केलेला आहे. सदरहू स्मशानभुमीची पुर्नबांधणी करण्यासाठी, जुनी स्मशानभुमी तोडण्याचे काम दि.15/02/2026 पासून सुरु करण्यात येणार आहे. यामुळे शिवमंदिर स्मशानभुमीमध्ये फक्त गॅस शवदाहिनी सुरु राहिल, उर्वरित स्मशानभुमी संपुर्णपणे बंद राहील.

तरी नागरीकांनी अंत्यविधीसाठी खालील स्मशानभुमींचा वापर करुन, महापालिकेस सहकार्य करावे.

* कुंभारखान पाडा स्मशानभुमी, डोंबिवली (पश्चिम).
* पाथर्ली स्मशानभुमी, कल्याण रोड, डोंबिवली (पूर्व).
* म्हसोबा चौक स्मशानभुमी, ठाकुर्ली, डोंबिवली (पूर्व).

# स्वीकृत नगरसेवकाबाबत निर्णय न झाल्यास उपोषणाला बसणार

## - संतोष श्रृंगारपुरे यांचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : नगर विकास आघाडी पेण संतोष श्रृंगारपुरे गटाच्या पाच नगरसेवकांच्या गटाला जिल्हाधिकारी रायगड व प्रांत अधिकारी यांनी कायदेशीर मान्यता देऊन देखील 16 जानेवारी 2026 रोजी पार पडलेल्या स्वीकृत नगरसेवकांची निवड जाहीर करताना पेणच्या नगराध्यक्षांनी फक्त दोन स्वीकृत सदस्यांची निवड जाहीर केली. मात्र या सभेत तिसरे स्वीकृत नगरसेवक उपेंद्र अनंत कोलाडकर यांची निवड जाहीर न केल्याने या विरोधात नगरविकास आघाडीचे सदस्य आक्रमक झाले आहेत. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत नगराध्यक्षांच्या निर्णया विरोधात पेण नगरपरिषद समोर एक दिवस लाक्षणिक उपोषणाला बसणार असल्याची घोषणा आघाडीचे प्रमुख माजी नगराध्यक्ष संतोष श्रृंगारपुरे यांनी पत्रकारां समोर केली.

पेण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी दिनांक 16 जानेवारी रोजी पेण नगरपरिषदे मध्ये विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेमध्ये एकूण 3 स्वीकृत सदस्यांपैकी 2 सदस्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. एक उमेदवार





उपेंद्र अनंत कोलाडकर यांच्या निवडीबाबत पीठासीन अधिकारी यांनी शासनाचा निर्णय येईपर्यंत सदर निवड स्थगित ठेवली होती. या विरोधात आम्ही पेणकर आघाडीच्या धारकर गटाचे सचिव प्रदीप मोने यांनी केलेला अर्जाबाबत न विकास आघाडीच्या पाच सदस्य गटाने जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडे स्वच्छेने प्रवेश केला असल्याचे प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर धारकर गटातर्फे केलेला अर्ज रद्द बातल ठरवत निकाली काढत दि, 3 फेब्रुवारी रोजी आम्ही पेणकर आघाडीच्या अध्यक्षांना पत्राद्वारे अवगत केले आहे. त्यामुळे नगर विकास आघाडीचा स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा मार्ग जिल्हाधिकारी रायगड यांनी मोकळा केला आहे. आता पेण नगरपालिका नगराध्यक्षांनी याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास आम्ही लोकशाही मार्गाने याबाबत लाक्षणिक उपोषणाला बसणार असल्याचे नगर विकास आघाडीचे प्रमुख संतोष श्रृंगारपुरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. विशेष म्हणजे जो पर्यंत तिसरा स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया पूर्ण होत नाही तो पर्यंत इतर विषय समित्यांच्या सभापती पदासाठी निवड प्रक्रीया लांबली असल्याचे याबाबत तात्काळ निवडीची प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी असे पत्र 19 जानेवारी रोजी नगराध्यक्षांना जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहे. नगर विकास आघाडीच्या पाच सदस्य गटाला कायदेशीर मान्यता मिळाल्याने त्यांनी दिलेला उपेंद्र अनंत कोलाडकर यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे संतोष श्रुगांरपुरे यां यावेळी बोलताना सांगितले.

# डोंबिवली–ठाणे प्रवासासाठी केडीएमटीकडून पर्यायी बस सेवा सुरू करण्याबाबत बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवली ते ठाणे दरम्यान लोकल रेल्वेमध्ये वाढत्या गर्दीमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अलीकडेच बारावीच्या परीक्षेला जात असताना निष्पाप विद्यार्थ्याचा झालेला दुर्दैवी मृत्यू संपूर्ण डोंबिवलीकरांना हादरवून गेला असून या घटनेमुळे सुरक्षित पर्यायी वाहतूक व्यवस्थेची तातडीची गरज अधोरेखित झाली आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपा नगरसेवक दिपेश म्हात्रे यांची आज कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत लोकल रेल्वेवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने बस सेवा सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



या बैठकीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या, यामध्ये केडीएमटीच्या माध्यमातून तातडीने बस सेवा सुरू करावी. प्रस्तावित मार्गावर त्वरित प्रत्यक्ष पाहणी करून कार्यवाही करावी. नागरिकांच्या सोयीसाठी लवकरात लवकर वेळापत्रक निश्चित करावे.

प्रस्तावित बस मार्ग हा मोठागाव सर्कल – मोठागाव मानकोली ब्रिज – मानकोली – माजिवडा सर्कल – घोडबंदर रोड असा आहे.

ही बस सेवा सुरू झाल्यास डोंबिवली ते ठाणे दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळेल तसेच लोकल रेल्वेवरील ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही पर्यायी व्यवस्था लवकरात लवकर सुरू व्हावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे नगरसेवक दिपेश म्हात्रे यांनी सांगितले.

ठाणे ■ शुक्रवार
१३ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# जिल्हा परिषद ठाणेला "सेवाकर्मी पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित "सेवाकर्मी + पुरस्कार" कार्यक्रमांतर्गत राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यांकनात जिल्हा परिषद ठाणे यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवत १०० पैकी ८० गुणांकन मिळवून "सेवाकर्मी पुरस्कार" प्राप्त केला आहे. राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदांमध्ये स्थान मिळविणे ही जिल्हा परिषद ठाणेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या मूल्यांकनासाठी शासनाच्या विविध निकषांनुसार प्रशासनिक कार्यपद्धती, सेवाविषयक नोंदींचे व्यवस्थापन, कर्मचारी सेवा विषयक पारदर्शकता, वेळेवर नोंदी अद्ययावत ठेवणे, शासकीय सेवा नियमांचे पालन तसेच कार्यालयीन कामकाजातील शिस्त आणि गुणवत्तेचा सखोल आढावा घेण्यात आला. गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा नोंदींचे संगणकीकरण, सेवाज्येष्ठता सूची विहित कालावधीत प्रसिद्ध करणे, भरती व पदोन्नती अंतर्गत विहित निकषानुसार नियुक्ती देणे, iGOT पोर्टल (कर्मयोगी पोर्टल) वरील प्रशिक्षण पूर्ण करून घेणे तसेच कर्मचारी व्यवस्थापनातील पारदर्शकता या बाबींमध्ये विशेष प्रगती करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचारी सेवा पुस्तिका अद्ययावत ठेवणे, संवर्गनिहाय माहितीचे शिस्तबद्ध संकलन व शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन ही बाब गुणांकनामध्ये महत्त्वाची ठरली. कार्यालयीन कामकाजातील सुसूत्रता, ई-प्रणालींचा प्रभावी वापर, तसेच कर्मचारी विषयक कामांमध्ये वेग आणि अचूकता राखल्यामुळे जिल्हा परिषद ठाणे यांना उच्च गुणांकन मिळाले आहे. या यशामागे अधिकारी-कर्मचारी यांचे समन्वयित प्रयत्न, प्रशासनातील शिस्तबद्धता आणि सेवा वितरणातील गुणवत्ता कायम ठेवल्याने महत्त्वाची ठरली आहे. या यशाबद्दल जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाने सर्व अधिकारी-कर्मचारी यांचे अभिनंदन केले असून, भविष्यातही प्रशासनिक कामकाज अधिक परिणामकारक व पारदर्शक ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# निळजे आरोग्य केंद्रात हाणामारी

## कल्याणच्या आरोग्य विभागात चाललयं तरी काय?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बरोबर एक वर्षांपूर्वी तत्कालीन सीईओ रोहन घुगे यांनी निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रातील ४ ते ५ कर्मचाऱ्यांना निंलबित केले होते, यानंतर १४ फेब्रुवारी रोजी तत्कालीन तालूका आरोग्य अधिकारी डॉ भारत मासाळ यांनी या केंद्रास भेट दिली होती, या घटनेनंतर तरी तालुका आरोग्य विभागात सर्व काही सुरळीत चालू राहिल असे वाटत असतानाच दोनच दिवसापूर्वी निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर च्या डेंटल विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये'कँन्सर व्हँन, प्रकरणावरून प्रथम 'तू तू मै मै,व नंतर हाणामारी झाल्याची माहिती मिळत असून याबाबत जिल्हावरुन संबंधित




कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

जिल्हा परिषदेचे तत्कालीन सीईओ रोहन घुगे यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी तालुक्यातील निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रास अचानक भेट दिली, यावेळी येथे उपस्थित नसलेल्या ४ ते ५ कर्मचाऱ्यांवर १३फेब्रुवारी ला निलंबनाची कारवाई केली, यानंतर लगेच १४ फेब्रुवारी ला तेंव्हाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ भारत मासाळ यांनी भेट देऊन परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्व काही सुरळीत होईल असे वाटत असताना गोवेली आग प्रकरण, टिटवाळा येथील श्रमजीवी चा कार्यक्रम, कर्मचारी, आशा वर्कर्स, यांना मेमोवर मेमो, असे अनेक प्रकार या विरोधात सामाजिक कार्यकर्ते महेश देशमुख, किरन केणे यांनी केलेल्या तक्रारी यामुळे तालुका आरोग्य विभाग सतत चर्चेत राहिला. आता मंगळवारी निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्करोग मोबाईल व्हँनचा फेब्रुवारी२०२६आगाऊ फिरता दौरा लावण्यात आला होता. तो प्रथम पिंपरी येथे आयोजित करण्यात आला असताना शिवाय तेथे पेंशट सकाळीच आल्याने अचानक हा कँम्प लोढा येथे बदलण्यात आला, याची वेळ सकाळी ९ ते १० असताना यासाठी नियुक्त केलेले डॉक्टर व कर्मचारी ११:३० ते १२वाजले तरी आले नव्हते, यावरून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ सुस्मिता कैमल यांनी लेट आलेल्या मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर च्या डेंटल विभागातील कर्मचारी दिप्ती दांडेकर यांना जाब विचारताच दोघी मध्ये प्रथम तू तू मै मै,व नंतर मोबाईल फेकून देणे, हात मुरगळणे, मारहाण करणे असे प्रकार घडले, यामुळे सर्वच गोंधळून गेले, असे असतानाही १५० पेशंट चे टार्गेट असताना ५० रुग्णांची तपासणी केल्याचे तसेच हा सर्व प्रकार जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सुतार यांना सांगितल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ सुस्मिता कैमल यांनी सांगितले. विशेष म्हणजे हे सर्व तालुका आरोग्य अधिका-यांच्या उपस्थितीत घडतय यांचे आश्चर्य वाटत.याबाबत जिल्हाला विचारले असता संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई सुरू केली असल्याचे सांगण्यात आले.

# संतोष नाईक यांना आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** सार्वजनिक विद्यालय पेण येथील प्राचार्य यांना राज्यस्तरीय आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सदर पुरस्काराचा कार्यक्रम विवा कॉलेज माणगाव जिल्हा रायगड येथे संपन्न झाला.




सार्वजनिक विद्यालय पेण येथे प्राचार्य असलेले संतोष हिराजी नाईक यांचे व्यक्तिमत्व सुर्जनशील मनमिळावू तसेच माहिती तंत्रज्ञान, संगणक, डिजिटल कॅमेरा, मोबाईल इंटरनेट यासारख्या विविध माध्यमांच्या पसाऱ्यात मर्यादशील राहून काळाबरोबर झोकुन देऊन समाजप्रती आपली निष्ठा आणि प्रेम समाजाच्या विविध क्षेत्रात वैविध्यपूर्ण केलेल्या कार्याचा गौरव म्हणून पेण तालुक्यातील प्रसिद्ध असलेले सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य संतोष हिराजी नाईक यांना विवा कॉलेज माणगाव चा आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. प्राचार्य संतोष हिराजी नाईक यांना राज्यस्तरीय आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेचे चेअरमन सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकांनी तसेच कॉलेजमधील मुला-मुलींनी सरांचे अभिनंदन केले.

# 75 वर्षे पूर्ण शिक्षकांना 'अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी' पुरस्कार

**- शिवानंद भरले**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने २९ जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मान देण्यात येणार असून शिक्षक बांधवांनी नामांकनासाठी २० फेब्रुवारी पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील जिल्हा परिषद नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील सेवानिवृत्त झालेल्या व वयाच्या ७५ वर्षे पूर्ण केलेल्या शिक्षकांना महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी सन्मान देऊन २३ फेब्रुवारीला सोलापूर येथील कार्यकारी मंडळ सभेत करण्यात येणार असल्याची माहिती राज्य अध्यक्ष शिवानंद भरले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे आहे.

शिक्षण विभागात अविरतपणे अध्यापनाचे कार्य करून आजही वयाच्या ७५ वर्षे पूर्ण केलेले आणि शिक्षणाला



वाहून घेतलेल्या सेवानिवृत्त शिक्षकांना अमृतमहोत्सवी शिक्षण तपस्वी म्हणून निवड करण्यासाठी विजयकुमार बहाकर(अकोला) बाळासाहेब काळे(सोलापूर) कोल्हापूर जिल्ह्यातील श्री राजाराम वरूटे( कोल्हापूर) रघुनाथ शंकर पाटील. (फोन नं 9272553292) रायगड या जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षकांची समिती गठीत करून निवड करण्यात येणार आहे. तरी राज्यातील सर्व जिल्ह्यातील वयाच्या ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सेवानिवृत्त शिक्षकांनी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटना या व्हाटसप ग्रुपवर नामांकन करावेत असे आवाहन राज्य सरचिटणीस रामराव व-हाड हिंगोली यांनी एका पत्रकान्वये केली आहे.

# शहापूर तालुक्यातील गाव-पाड्यांना पाण्याची झळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** शहापूर तालुका हा धरणांचा तालुका असूनही या शहापूर तालुक्यात तानसा, वैतरणा, भातसा ही मोठी धरणे असून मुंबईला मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत असतो तसेच या तालुक्यात अनेक लहान धरणे ही असून सुद्धा योग्य नियोजन नसल्यामुळे तालुक्यातील 424 गांव-पाड्यांना जानेवारी व फेब्रुवारीपासून पाण्याच्या तीव्र टंचाईची झळ लागत असते म्हणूनच म्हणतात धरणाजवळ आमचे गाव पण पाण्यासाठी धावाधाव ही परिस्थिती या तालुक्यात पहावयास मिळते. यासाठी टंचाई कृती आराखड्याला मंजुरी मिळाली असून या प्रस्तावित कामांसाठी 17 कोटी 29 लाख अंदाजीत खर्च अपेक्षित केला आहे.

सन 2025-026 साठी टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून या आराखड्यात तालुक्यातील 120 गांवे व 304 पाड्यांचा समावेश आहे. यामध्ये नवीन विंधन विहीर, पुरक नळ पाणी पुरवठा

### टंचाई कृती आराखड्याला मंजुरी तर प्रस्तावित कामांसाठी 17 कोटी 29 लाख अंदाजित खर्च अपेक्षित

योजना, नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती व टँकरने पाणी पुरवठा करणे या विविध पाणी पुरवठा कामी योजना आखण्यात आलेल्या आहेत.

दरवर्षी ऐन उन्हाळयात तालुक्यातील अनेक गावं पाड्यात तीव्र पाणी टंचाई जाणवत आहे. ही पाणी टंचाई दूर व्हावी यासाठी जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून तसेच पंचायत समिती विभागाच्या देखरेखीखाली विविध पाणी योजना राबविल्या जात आहेत. काही गांव-पाड्यांना तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असल्याने येथे टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

यंदाही या पाणी टंचाई समस्या दूर व्हावी यासाठी कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून यामध्ये टँकरने पाणी पुरवठासाठी जाने ते मार्च 25 गांव, 95पाड्यासाठी 72 लाख, एप्रिल ते जून 62 गांव, 156 पाडे साठी 3 कोटी 27 लाख, नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती जानेवारी ते मार्च 22 गांव, 14 पाडे यासाठी 7 कोटी 51 लाख 40 हजार, पुरक नळ पाणी पुरवठा योजना जानेवारी ते मार्च 09 गांव, 14 पाडे याकामी 5 कोटी 51 लाख 60 हजार तर नविन विंधन विहीरी हातपंप जानेवारी ते मार्च 02 गांव, 25 पाड्यांसाठी 27 लाख रुपये अशी प्रस्तावित कामे नियोजित करून यासाठी एकूण 17 कोटी 29 लाख रुपये अंदाजित खर्च अपेक्षित केलेला आहे.

दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये पाणी समस्या निर्माण होत असून शहापूर तालुक्यात ऐन उन्हाळयात पाणी टंचाई समस्या अधिक जाणवत असते. यासाठी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून विविध योजना राबवून पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# ठाणे जिल्ह्यात 'अरुणोदय सिकलसेल ऍनिमिया' मोहिमेअंतर्गत लाखो नागरिकांची तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली 'अरुणोदय सिकलसेल ऍनिमिया विशेष अभियान' दि. 15 जानेवारी पासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या अभियानाची अंमलचजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत असून, जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागामध्ये 0 ते 40 वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. तसेच व्यापक जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे.

अभियानाची सद्यस्थिती (दि. 15 जानेवारी ते 10 फेब्रुवारी 2026) या कालावधीत जिल्ह्यातील विविध भागांमध्ये एकूण 1 लाख 45 हजार 392 घरभेटी देण्यात आल्या. घरभेटीदरम्यान 118 सिकलसेल रुग्णांना तसेच 1909 सिकलसेल वाहक व्यक्तींना भेट देऊन आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन



करण्यात आले.

या कालावधीमध्ये आज अखेरपर्यंत 2 लाख 21 हजार 449 एवढ्या व्यक्तींच्या सोल्युबिलिटी तपासण्या करण्यात आल्या असून, त्यामध्ये एकूण 15 नवीन सिकलसेल रुग्ण आढळले असून 230 सिकलसेल वाहक आढळून आले आहेत.

कार्ड वितरणाची स्थिती

तपासणी पूर्ण झालेल्या व्यक्तींना पुढीलप्रमाणे कार्ड वितरित करण्यात आले आहे -

- 1 लाख 15 हजार व्यक्तींना पाढरे कार्ड.
- 230 सिकलसेल वाहक व्यक्तींना पिवळे कार्ड.
- 15 सिकलसेल रुग्णांना लाल कार्ड.

सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये एकूण 133 सिकलसेल रुग्ण असून 2139 एवढे सिकलसेल वाहक आहेत.

सिकलसेल ऍनिमिया हा एक अनुवांशिक रक्त विकार असून, वेळेवर तपासणी, समुपदेशन व योग्य उपचारांद्वारे त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर टाळता येऊ शकतात. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील 0 ते 40 वयोगटातील सर्व नागरिकांनी सिकलसेल तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी यांनी कळविले आहे.

# उत्कर्ष महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक सोहळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील उत्कर्ष, कला, वाणिज्य आणि विज्ञान (आय.टी.) महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन समारंभ २०२६ चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाज हितकरिणी संस्थेचे अध्यक्ष अरुण विठ्ठल वारघडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला




तसेच या कार्यक्रमांसाठी उपाध्यक्ष अनिल मानिवडे, सचिव रामदास शेळके, अंतर्गत हिशोब तपासणीस विश्वास परटोले,सह खजिनदार भास्कर भोईर, सहसचिव अरुण भालेकर, दिनेश बोटकोंडले, प्रतिमा अरुण वारघडे, शुभांगी अनिल मानिवडे, सुजाता रामदास शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. शैक्षणिक वर्ष 25 -26 मध्ये उत्कृष्ट सहायक अभिव्यख्याता म्हणून प्रा.नितीन बाळू वेखंडे, प्रा. भारती किरण बिन्नर आणि उत्कृष्ट सूत्रसंचालिका म्हणून प्रा. दीपिका मयूर काबाडी तसेच सर्वोत्कृष्ट कर्मचारी म्हणून सपना रामदास जाधव यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. विविध क्रीडा व कला क्षेत्रामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. वार्षिक स्नेह संमेलनमध्ये विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.शेषराव मसुडकर, उप-प्राचार्य प्रा.अजित पोटे यांच्या नियोजना खाली पार पडला तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. उषा शेलार, प्रा. दीपिका काबाडी व प्रा.संदीप पवार यांनी केले तर आभार प्रा. दीपिका काबाडी यांनी मानले.

# शहाड रेल्वे स्थानकात घोणस

## 'वॉर'कडून सापाचे सुरक्षित रेस्क्यू



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (प्रशांत घोडविंदे) :** शहाड रेल्वे स्थानकात लावण्यात आलेल्या शोभेच्या झाडांच्या जाळीत घोणस जातीचा साप आढळल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली. अखेर वॉर फाउंडेशनचे सर्पमित्र प्रेम आहेर यांनी घटनास्थळी धाव घेत त्याला पकडले. फलाट क्रमांक १ वरील शोभेच्या झाडांच्या जाळीत साप दिसताच, प्रवाशांची तारांबळ उडाली आणि तेथे भीतीचे वातावरण पसरले. वॉर फाउंडेशनचे सर्पमित्र आहेर यांना तातडीने संपर्क करण्यात आला. जाळीत अनेक झाडांच्या कुंड्या असल्याने त्याचा शोध घेताना आहेर यांना कसरत करावी लागली. अखेर साप निदर्शनास पडताच, त्याचा सुखरूप बचाव केला आणि त्याला पकडले. पकडलेल्या सापाला वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली लवकरच निसर्गाच्या सहवासात सोडले जाईल, अशी माहिती आहेर यांनी दिली.

# शेई विभाग हायस्कूलच्या एस. एस. सी. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील शेई विभाग हायस्कूलच्या इ. दहावीच्या विद्यार्थ्यांचा 47 व्या बॅचचा निरोप समारंभ बुधवार दिनांक 11 फेब्रुवारी 2026 रोजी शेई संस्थेचे अध्यक्ष नितीनजी जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले व सरस्वती मातेला पुष्पहार घालून व पूजन करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळ वासिंद चे सदस्य तसेच वासिंद ग्रामपंचायतचे सदस्य प्रसिद्ध उद्योजक व समाजसेवक विलास धोंडू जगे तथा बाळू शेठ जगे , तसेच वासिंद ग्रामपंचायत सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व समाजसेवक संदीप पाटील




आणि कामगार नेते व समाजसेवक डॉ.मनोहरजी सासे , संस्थेचे पदाधिकारी एल डी भोईर अंकुशजी भोईर जयंतजी जाधव तसेच शालेय समितीचे चेअरमन जगन्नाथजी तारमळे , व्हॉइस चेअरमन राम तारमळे, विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एन एच चौधरी व माजी मुख्याध्यापक शांतकुमार लच्याने , शालेय समिती सदस्य आनंद जाधव काशिनाथ परटोले, संजय विशे व शाळेतील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक उत्तम आव्हाड सर जेष्ठ शिक्षक पिंपळसे, वसंत धनगर, सुरेश सोनवणे सुनिल निचिते, अमित उमतोल, गणेश आंधळे विजय पवार, नितीन तारमळे योगेश तारमळे, हर्षदा शेंडे शिक्षकेतर कर्मचारी राजाराम तारमळे कोंडीबा माने अशोक रेरा, संभाजी धिर्डे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि नुकताच आयपीएल मध्ये निवड झालेला ओंकार तारमळे याचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच मागील वर्षी एस,एस,सी परीक्षेत विद्यालयात प्रथम आलेली समीक्षा उल्हास तारमळे तसेच प्रत्येक विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला तसेच यावर्षी दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खूप मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी पार पाडला या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे जेष्ठ शिक्षक वसंत धनगर व विजय पवार यांनी केले सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या अध्यक्षांच्या वतीने भोजन देण्यात आले अशाप्रकारे हा कार्यक्रम संपन्न झाला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024